Publication : Punya Nagri
Date: December 23, 2020

# सोमानी होम इनोव्हेशनचा स्वच्छता-जंतुनाशकांच्या क्षेत्रात प्रवेश

**नवी दिल्ली** : हिंदवेअर अप्लायन्सेसचे निर्माते असलेल्या सोमानी इनोव्हेशन लिमिटेडने विद्यमान कोविड-१९ च्या संकटाला प्रतिसाद म्हणून सुरक्षेसाठी अत्यावश्यक उत्पादनांच्या क्षेत्रात प्रवेश करत ॲक्टिव्हिओ फूड स्टरलायझर आणि पर्ज सरफेस डिसइन्फेक्टंट जनरेटर अशा जंतुनाशक उत्पादनांचे अनावरण केले आहे. ग्राहकांचे आरोग्य आणि स्वच्छता यांना सर्वोच्च प्राधान्य देत असताना कंपनीने तंत्रज्ञानात्मक उत्पादने तयार करण्यासाठी आपल्या संशोधन आणि विकासात गुंतवणूक केली आहे. याबाबत सोमानी होम इनोव्हेशन लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पूर्ण वेळ संचालक राकेश कौल म्हणाले की, कोविड-१९ मुळे मानवी जीवनशैलीची मूलभूत तत्त्वे बदलली आहेत. सोशल डिस्टन्सिंग, मास्क आणि स्वच्छता या गोष्टी आपल्या आयुष्याचा एक अविभाज्य भाग बनल्या आहेत. ग्राहकांच्या सवयींमधील हा बदल आपल्याकडे कायम राहणार आहे आणि स्वच्छतेबाबत लोकभावना वाढीस लागली असताना जंतुनाशक उत्पादने, अन्न स्टेरिलायझर्स आणि पृष्ठभाग जंतुनाशक जनरेटर्सच्या मागणी-पुरवठ्यात मोठी दरी निर्माण झाली आहे. सोमानी होम इनोव्हेशन लिमिटेडमध्ये आमच्या ग्राहकांचे आरोग्य आमच्यासाठी सर्वोच्च प्राधान्याचे ठरते. पर्ज आणि ॲक्टिव्हिओच्या अनावरणासोबत आम्हाला आशा आहे की, आरोग्य आणि स्वच्छतेच्या क्षेत्रातील ही दरी आम्ही कमी करू शकू. आम्हाला या अनावरणाला बाजारातून मोठा प्रतिसाद मिळेल, अशी आशा आहे.